# जनसंपर्क अधिकारी

पोलीस आयुक्त, मिरा-भाईंदर, वसई-विरार यांचे
कार्यालय रामनगर सृष्टी, मिरारोड पुर्व, जि. ठाणे
दुरध्वनी क्र. ०२२-२९४५१००१
E-mail: pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in

**प्रेसनोट क्रमांक २८२/२०२४** **दिनांकः- ३१/०७/२०२४.**

**"हनूमान नगर नालासोपारा पश्चिम येथे कारवाई करुन अवैध्य वेश्याव्यवसाय करवुन घेणाऱ्या पुरुष आरोपीस अटक करुन एक पिडीत महीलेची सुटका करण्यात अनैतिक मानवी वाहतुक प्रतिबंध कक्ष नालासोपारा यांना यश"**

नालासोपारा पोलीस ठाणे हद्दीतील दूर्वा अपार्टमेंट रुम नं.४०३ सी विंग ,हनूमान नगर ,मैत्री अपार्टमेंट जवळ नालासोपारा पश्चिम ता.वसई जि.पालघर याठिकाणी एक पुरुष वेश्यादलाल हा वेश्यागमनाकरीता त्याचे राहते घरी मुली पुरविणार असल्याची गोपनीय माहीती अनैतीक मानवी वाहतुक शाखेचे पोलीस निरीक्षक सौरभी पवार मॅडम यांना मिळाल्यावरुन पोलीस पथक, बोगस गिऱ्हाईक व दोन पंच असे सदर ठिकाणी जावुन दि.३०/०७/२०२४ रोजी कारवाई करुन पुरुष वेश्यादलाल मल्हारी खंडु कसबे वय ३६ वर्षे,रा.सी/४०३ दुर्वा अपार्टमेंट,छेडा नगर,राहुल इंटरनॅशनल स्कुल जवळ हनुमान नगर,नालासोपारा(प),यास अटक करुन एक महीला पिडीतेची सुटका करण्यात अनैतिक मानवी वाहतुक प्रतिबंध कक्षास यश आलेले आहे.

सदर बाबत थोडक्यात हकीकत अशी कि, बोगस गि-हाईक तयार करुन त्यास नमुद वेश्यादलाल याचेकडे मिळालेल्या माहीतीच्या आधारे वेश्यादलाल याचे मोबाईल क्रमांकावर व्हॉट्सअॅप मॅसेज करुन वेश्यागमनासाठी मुलीची मागणी केली असता त्याने सांगितले की, मी एका मुलीचे ३०००/- रु. घेतो .आपणास कबुल असेल तर सी/४०३ दुर्वा अपार्टमेंट,छेडा नगर, राहुल इंटरनॅशनल स्कुल जवळ हनुमान नगर,नालासोपारा(प) येथे येण्यास सांगितल्यावर बोगस गि-हाईक याने त्यास होकार दिला. त्यानंतर बोगस गि-हाईक हा पंचासह सदर ठिकाणी गेले असता वेश्यादलाल मल्हारी खंडु कसबे वय ३६ वर्षे याने बोगस गिऱ्हाईकास एक महीला दाखवली असता वेश्यादलालाने बोगस गिऱ्हाईक यास माझे कमिशन व वेश्यागमनाचा मोबदला म्हणुन मला ठरल्याप्रमाणे पैसे दया असे सांगितल्यावर बोगस गिऱ्हाईक याने पोनि/पवार मॅडम यांनी दिलेल्या सुचनेप्रमाणे सदर महीलेस पसंद करुन छापा पंचनाम्यातील ठरल्याप्रमाणे त्यास पैसे दिले असता बोगस गिऱ्हाईक याने पोलीस पथकास कन्फरमेशन इशारा दिला असता सदर ठिकाणी जावून छापा टाकला त्यामध्ये एक पुरुष दलाल आरोपीत नामे मल्हारी खंडु कसबे यास ताब्यात घेतले व पिडीत महिला हिची वेश्याव्यवसाया पासुन सुटका केली आहे.

यातील वेश्यादलाल नामे मल्हारी खंडु कसबे, रा.सी/४०३ दुर्वा अपार्टमेंट, छेडा नगर, राहुल इंटरनॅशनल स्कुल जवळ हनुमान नगर, नालासोपारा प. ता. वसई, जि. पालघर, मुळ रा.लातुर याने पिडीत महिलांना पैशाचे आमिष दाखवुन वेगवेगळया ग्राहकांना बोलावुन त्यांचेकडुन पैसे घेवुन पिडीत महीला यांना वेश्याव्यवसाय करण्यास भाग पाडले व वेश्यागमनाचा मोबदला व कमीशन मिळुन असे एकुण एका महीलेचे ३०००/-रु. घेतो व त्यातील ५००/- रुपये पिडीत महीलांना देतो.

तरी सदर पिडीत महीला यांची वेश्याव्यवसायाच्या दलदलीतून सुटका करुन नमूद पुरुष दलाल आरोपीत यास अटक करुन नालासोपारा पोलीस ठाणे गु.रजि.नं.२८१/२०२४ भारतीय न्याय संहिता २०२३ चे कलम १४३(२) सह अनैतिक मानवी व्यापार प्रतिबंध कायदा १९५६ चे कलम ४,५ प्रमाणे आरोपीत मल्हारी खंडु कसबे, याचेवर गुन्हा दाखल केला आहे.

सदरची कारवाई ही पोलीस उप आयुक्त श्री. अंबुरे,(गुन्हे शाखा), सहायक पोलीस आयुक्त श्री. मदन बल्लाल (गुन्हे शाखा), यांचे मार्गदर्शनाखाली अनैतिक मानवी वाहतुक प्रतिबंध शाखा नालासोपारा युनिटचे पोनि/सौरभी पवार व सफौ/गवई, मपोहवा/डोईफोडे, शेटये, किणी, चालक पोहवा/पागी, तिवले, मपोशि/पाटील सर्व नेम.अनै.मा.वा. प्र.कक्ष नालासोपारा यांनी उत्कृष्ठरित्या पार पाडली आहे.

--------oooo--------